सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी
## जिल्हा शाखा, जळगांव




# वार्षिक अहवाल
## २०१८ - १९

रजि. नं. ई-२१ दि. १३/०७/१९५३

मानवता ✚ नि:पक्षपातीपणा ✚ तटस्थता ✚ स्वातंत्र्य ✚ स्वयंसेवा ✚ एकता ✚ विश्वव्यापकता

कार्यकाळ १९ फेब्रुवारी २०१९ पर्यंत


**किशोरराजे निंबाळकर (भा.प्र.से.)**
जिल्हाधिकारी तथा माजी अध्यक्ष


**डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी


**गनी मेमन**
उपाध्यक्ष


**विनोद बियाणी**
मानद सचिव


**सतिश परख**
कोषाध्यक्ष


**डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी**
रक्तपेढी चेअरमन


**राजेश यावलकर**
सहसचिव


**अनिल कांकरिया**
सहकोषाध्यक्ष


**प्रो. शेखर सोनाळकर**
कार्यकारिणी सदस्य


**डॉ. विजय चौधरी**
कार्यकारिणी सदस्य


**अशोक जैन**
कार्यकारिणी सदस्य


**घनश्याम महाजन**
कार्यकारिणी सदस्य


**सौ. पुष्पा भंडारी**
कार्यकारिणी सदस्य


**संदिप काबरा**
कार्यकारिणी सदस्य


**सुभाष सांखला**
कार्यकारिणी सदस्य


**धनंजय जकातदार**
कार्यकारिणी सदस्य


**डॉ. अपर्णा मकासरे**
कार्यकारिणी सदस्य


**अमित शिरसाळे**
कार्यकारिणी सदस्य


**डॉ. सुभाष राणे**
कार्यकारिणी सदस्य



रेडक्रॉसचे सन्माननीय डॉ. अविनाश ढाकणे- अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी व श्री. किशारराजे निंबाळकर सचिव- महसूल, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई समवेत पदाधिकारी व कार्यकारीणी



'रेडक्रॉस भवन' लोकार्पण सोहळा प्रसंगी रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी व श्री. किशारराजे निंबाळकर समवेत पदाधिकारी व कर्मचारी



जळगांव रेडक्रॉस रक्तपेढीच्या इतिहासातील पहिले रक्तदाते डॉ. सतिष चित्रे यांचा सन्मान



दै. दिव्यमराठी आयोजीत रक्तदान शिबीर



दै. लोकमत आयोजीत रक्तदान शिबीर



जैन उद्योग समूह आयोजीत रक्तदान शिबीर



गोदावरी इंजि. कॉलेज आयोजीत रक्तदान शिबीर



रोटरी क्लब जळगांव वेस्टच्या सहयोगाने 'रक्तपेढी आपल्या दारी- फिरते रक्तदान शिबीर' शुभारंभ



कु. स्नेहल बांगड यांचे सदिच्छा भेट प्रसंगी रक्तदान



झोनल रेल्वे ट्रेनिंग इंस्टिट्यूट भुसावळ- रक्तदान शिबीर



आयकर दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबीर



जळगांवशहर महानगर पालिका आयोजित रक्तदान शिबीर



इंडियन रेडक्रॉस सोयायटी दिव्यांग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी बद्दल दिव्यांग प्रेरणा पुरस्काराने सन्मानित



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सायकल वाटप



रोटरी क्लब जळगांव वेस्टच्या सहयोगाने कॅलीपर वाटप



दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत मुल्यमापन व थेरपी सेवा शिबीर



दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत कॅलीपर फिटमेंट व मोजणी शिबीर




भारत विकास ग्रुपचे डॉ. हणमंतराव गायकवाड यांचे विषमुक्त शेती-निरोगी भारत विषयावर मार्गदर्शन



सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मतदान जनजागृती अभियान



महिलांना हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी मार्गदर्शन करतांना डॉ. मकासरे



डॉ.नितीन चौधरी,यांचे जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती अभियान



प्लास्टीक मुक्ती अभियाना अंतर्गत जनजागृती अभियान




रोश कंपनी मुंबई येथे नॅट तंत्रज्ञानासंबंधी माहिती घेतांना तत्कालीन जिल्हाधिकारी मा. किशोर राजे निंबाळकर व रेडक्रॉस पदाधिकारी




रेडक्रॉस रक्तपेढीमध्ये कार्यान्वित रोश कंपनीचे नॅट युनिट

- नॅट (NAT) म्हणजे (न्यूक्लिक ॲसिड टेस्ट) सर्वाधिक सुरक्षीत रक्तपुरवठा करणारे जागतीक दर्जाचे प्रभावी तंत्रज्ञान
- नॅट (NAT) तंत्रज्ञाना द्वारे प्रतिजैविकांन ऐवजी रक्तांची रोग जतूंची संक्रमीत जनुके (DNA-RNA) शोधून काढली जातात.
- नॅट (NAT) तंत्रज्ञानामुळे विंडो पिरीयड कमी होण्यास मदत होते
- आपल्या आप्तस्वकियांच्या अधिक सुरक्षीततेसाठी नॅट तंत्रज्ञानाचा वापर करा.

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

## कार्यकारिणी मंडळ

| अ.क्रं. | कार्यकारिणी व पदाधिकारी नाव | पद | समिती चेअरमन |
|---|---|---|---|
| ०१ | मा. डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.) | जिल्हाधिकारी | विद्यमान अध्यक्ष |
| ०२ | मा.श्री. किशोर राजे निंबाळकर (भा.प्र.से.) (कार्यकाळ - २५.०३.२०१७ ते ११.०२.२०१९) | सचिव - महसूल, मदत व पुनर्वसन (महाराष्ट्र राज्य) | तत्कालीन अध्यक्ष |
| ०३ | मा.श्री. गनी अब्दुल मजीद मेमन | उपाध्यक्ष | रेडक्रॉस इस्टेट नियोजन समिती |
| ०४ | मा. श्री. विनोद लक्ष्मीनारायण बियाणी | मानद सचिव | खरेदी समिति व शिस्तपालन नियोजन समिति |
| ०५ | श्री. सतिष पुरणमल चरखा | कोषाध्यक्ष | अर्थ समिति |
| ०६ | डॉ. प्रसन्नकुमार चंपालाल रेदासनी | चेअरमन (रक्तपेढी) | चेअरमन (रक्तपेढी) |
| ०७ | श्री. राजेश कमलाकर यावलकर | सह सचिव | ज्युनिअर व युथ रेडक्रॉस समिति |
| ०८ | श्री. अनिल झुंबरलाल कांकरीया | सचिव रक्तपेढी | सह कोषाध्यक्ष व रक्तपेढी सचिव |
| ०९ | श्री. घन:श्याम त्र्यंबक महाजन | सह कोषाध्यक्ष | नोडल ऑफिसर - जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र |
| १० | डॉ. विजय कृष्णा चौधरी | कार्यकारणी सदस्य | प्रथमोपचार प्रशिक्षण समिती |
| ११ | श्री. अशोक भवरलाल जैन | कार्यकारणी सदस्य | नवीन प्रकल्प संकल्पना व निधी संकलन समिती |
| १२ | प्रा. शेखर मधुकर सोनाळकर | कार्यकारणी सदस्य | जेनेरिक मेडिसीन व दीर्घायु दवाखाना समिती |
| १३ | सौ. पुष्पाताई किशोर भंडारी | कार्यकारणी सदस्या | महिला सक्षमीकरण समिती |
| १४ | श्री. संदीप किसन काबरा | कार्यकारणी सदस्य | आंतरराष्ट्रीय संपर्क समिती |
| १५ | श्री. सुभाष सागरमल सांखला | कार्यकारणी सदस्य | आपत्ति व्यवस्थापन समिती |
| १६ | श्री. धनंजय मधुकर जकातदार | कार्यकारणी सदस्य | कर्मचारी कल्याण व प्रशिक्षण समिती |
| १७ | डॉ. अपर्णा बेंजामिन मकासरे | कार्यकारणी सदस्य | आरोग्य संवर्धन समिती |
| १८ | श्री. अनिल तोताराम शिरसाळे | कार्यकारणी सदस्य | शालेय शिक्षण समिती |
| १९ | डॉ. सुभाष सदाशिव राणे | कार्यकारणी सदस्य | नर्सिंग व जीवन कौशल्य प्रशिक्षण समिती |

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

## रक्तपेढी समिती, जळगाव

| | |
|---|---|
| डॉ. प्रसन्नकुमार चंपालाल रेदासनी | चेअरमन रक्तपेढी |
| श्री. अनिल झुंबरलाल कांकरीया | सचिव रक्तपेढी |

## रक्तपेढी समिती सदस्य

**पदसिध्द सदस्य व मार्गदर्शक – पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य**

| अ.क्रं. | नाव | अ.क्रं. | नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरेश लक्ष्मीनारायण खंडेलवाल | २ | श्री. संजय रामगोपाल तापडिया |
| ३ | डॉ. अनिल जगन्नाथ खडके | ४ | डॉ. शरद दामोदर अकोले |
| ५ | श्री. शिरीष धनराज शिसोदिया | ६ | डॉ. राजेंद्र शांताराम पाटील |
| ७ | श्री. विराज अशोक कावडिया | ८ | डॉ. सतीश वसंत शिंदाडकर |
| ९ | डॉ. कमलाकर पुंडलिक पाटील | १० | अँड. अनुराधा लक्ष्मण वाणी |
| ११ | श्री. मदन रामनाथ लाठी | १२ | श्री. रितेश अनिल महाजन |
| १३ | श्री. दिग्विजय लक्ष्मण तिवारी | १४ | सौ. रजिता संजय राजेशिर्के |
| १५ | श्री. सुनील गोपाल वर्मा | १६ | श्री. कमलाकर देवराम पाटील |
| १७ | श्री. सचिन कैलास पाटील | १८ | श्री. भाऊराव माधव माळी |
| १९ | श्री. रिकेशकुमार सुरेशचंद्र गांधी | २० | श्री. शंतनु अनिल अग्रवाल |
| २१ | श्री. हर्षदभाई कांतिलाल दोषी | २२ | श्री. मुकुंद देवपुरी गोसावी |
| २३ | श्री. राजकुमार दत्तात्रय वाणी | २४ | डॉ. प्रभू मावजी व्यास |
| २५ | श्री. प्रमोद अशोक सोनार | २६ | श्री. किरण देवराव बावस्कर |
| २७ | श्री. हरिष नटवरलाल चव्हाण | २८ | श्री. मनोज विश्वनाथ पाटील |
| २९ | सौ. चंद्रकांता दिलीप मुथा | ३० | श्री. मो. जावेदभाई चायवाले |
| ३१ | श्री. भूषण रमेश पाटील | ३२ | श्री. हेमंत पुंडलिक इंगळे |

## कर्मचारी प्रशासन विभाग

| अ.क्रं. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण जानकीराम तिवारी | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. महेश बाबुराव सोनगीरे | मुख्य लेखापाल |
| ३ | श्री. संजय रघुनाथ  साळुंखे | सह लेखापाल |
| ४ | सौ. उज्ज्वला सुनील वर्मा | जनसंपर्क अधिकारी |
| ५ | श्री. स्वप्नील जयसिंग वाघ | जनसंपर्क अधिकारी |
| ६ | श्री. मनोज नामदेव वाणी | कार्यालयीन सहायक |
| ७ | श्री. चंद्रकांत भागवत पाटील | ई सेतु व आधार केंद्र चालक |

## रक्तपेढी कर्मचारी वृंद

| अ.क्रं. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रकाश आनंदरूप संघवी | रक्त संक्रमण अधिकारी |
| २ | डॉ. प्रकाश भिकमचंद जैन | रक्त संक्रमण अधिकारी |
| ३ | डॉ. अनिल देवचंद चौधरी | रक्त संक्रमण अधिकारी |
| ४ | डॉ. अरविंद मेघ:शाम चौधरी | रक्त संक्रमण अधिकारी |
| ५ | डॉ. शंकरलाल भावजी सोनवणे | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | श्री. तिलोत्तम रमेश जोशी | टेक्निकल सुपरवायझर |
| ७ | श्री. अनिल वामन भोळे | टेक्निकल सुपरवायझर |
| ८ | श्री. राजेंद्र गोपाळ कोळी | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| ९ | सौ. सुनीता विष्णु वाघ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १० | सौ. सीमा सुशीलकुमार शिंदे | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| ११ | श्री. संदीप बाबुलाल वाणी | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १२ | श्री. विरेन्द्र पुंडलिक बि-हाडे | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १३ | सौ. गीतांजली सुनील कुंवर | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १४ | श्री. योगेश अशोक पाटील | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १५ | श्रीमती रूपाली प्रकाश बडगुजर | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १६ | श्री. नीलेश नरसिंग बारेला | ज्यू. प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १७ | श्री. सुनील सुरमल पावरा | ज्यू. प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १८ | सौ. सोनल नरेंद्र सपकाळे | ज्यू. प्रयोगशाळा तंत्रज्ञ |

| | | |
|---|---|---|
| १९ | कु. निशा रघुनाथ तपकिरे | ज्यू. प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| २० | श्री. किरण देवराव बावस्कर | प्रयोगशाळा सहायक |
| २१ | श्री. रविंद्र हरी जाधव | प्रयोगशाळा सहायक |
| २२ | श्री. नरेंद्र रामचंद्र पन्हाळे | प्रयोगशाळा सहायक |
| २३ | श्री. सतीश शिवाजी मराठे | प्रयोगशाळा सहायक |
| २४ | श्री. उमाकांत लोटन शिंपी | प्रयोगशाळा सहायक |
| २५ | श्री. मंगेश भास्कर ओतारी | प्रयोगशाळा सहायक |
| २६ | श्री. कामरान शेख अब्दुल रहीम | प्रयोगशाळा सहायक |
| २७ | श्री. किरण लक्ष्मण वानखेडे | प्रयोगशाळा सहायक |
| २८ | सौ. रजनी भगवतीप्रसाद बाजपयी | परिचारिका |
| २९ | कुमारी हुस्ना रंगरेज | समुपदेशक |
| ३० | श्री. अन्वर खान हमीद खान | वाहन चालक |
| ३१ | सौ. शीतल रमेश शिंपी | सफाई कर्मचारी |
| ३२ | श्री. समाधान देवीदास वाघ | सफाई कर्मचारी |

## जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्यरत कर्मचारी वर्ग

| अ.क्रं. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. सोपान पांडुरंग गणेशकर | केंद्र प्रमुख |
| २ | श्रीमती सुवर्णा धुडकू चव्हाण | मानसोपचार तज्ञ |
| ३ | श्री. शोएब शेख इम्रान | वाचा उपचार तज्ञ |

## पाटील धर्मार्थ दवाखाना कार्यरत कर्मचारी वर्ग

| अ.क्रं. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. जयप्रकाश नथ्थूजी खडसे | वैद्यकीय अधिकारी |
| २ | डॉ. वासुदेव बापुराव मावळे | वैद्यकीय अधिकारी |
| ३ | डॉ. प्रभा रमेश बडगुजर | वैद्यकीय अधिकारी |
| ४ | श्रीमती इंदिरा गजानन जाधव | परिचारिका |
| ५ | श्री. अमोल अशोकराव पाटील | दवाखाना सहायक |





कै. प्रा. शालिग्राम नवलराम पाटील
पाटील धर्मार्थ दवाखाना देणगीदाते



कै. डॉ. उल्हास नीळकंठ कडूसकर
तत्कालीन कार्यकारिणी सदस्य

# भावपूर्ण विनम्र श्रध्दांजली

अहवाल वर्षातील संस्थेचे दिवंगत सभासद, सभासदांचे दिवंगत आप्तेष्ट,
पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे दिवंगत आप्तेष्ट
कर्मचारी यांचे दिवंगत आप्तेष्ट
देशातील थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, सैनिक, सुरक्षा कर्मचारी, लेखक, साहित्यीक, पत्रकार, कलावंत, शिक्षणतज्ञ, खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते, देणगीदाते, रक्तदान शिबीर आयोजक, रक्तदाते, हितचिंतक व ज्ञात अज्ञात सर्व दिवंगताना

**नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रद्धांजली !**

**ईश्वर स्वर्गस्थ आत्म्याना चिरशांती देवो !**

## रक्तदाता अपघात विमा योजने अंतर्गत रुपये ५०,०००/-
## विमा रक्कम लाभार्थी रक्तदाते

**( सदर विमा रक्कम यांचे वारसदारांना देण्यात आली )**

| अ.नं | दिनांक | रक्तदाता | वारस | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १०.०४.२०१५ | कै. ज्ञानेश्वर अशोक देशमुख | श्री. अशोक पंढरीनाथ देशमुख, एरंडोल | ५००००.०० |
| २ | १७.०४.२०१५ | कै. चंद्रकांत नामदेव वालडे | श्रीमती निर्मलाबाई नामदेव वालडे जळगाव | ५००००.०० |
| ३ | २३.०४.२०१५ | कै. भूषण प्रभाकर कडू | श्री. प्रभाकर वासुदेव कडू, अमरावती | १०००००.०० |
| ४ | ०५.०८.२०१५ | कै. महेंद्र महादू महाजन | श्री. महादू गोटू महाजन, एरंडोल | ५००००.०० |
| ५ | १७.०८.२०१५ | कै. उमेश शिवाजी पाटील | स्वाती उमेश पाटील, वाडी, ता. पाचोरा | ५००००.०० |
| ६ | २३.१०.२०१५ | कै. राजेंद्र अशोक बडगुजर | श्रीमती नबाबाई अशोक बडगुजर, कठोली | ५००००.०० |
| ७ | ०४.०४.२०१६ | कै. भूषण भागवत लोहार | श्री. भागवत पी. लोहार, पाळधी | ११०००.०० |
| ८ | १७.०५.२०१६ | कै. विनोद परशुराम महाजन | श्रीमती निर्मलाबाई परशुराम महाजन, जळगाव | ११०००.०० |
| ९ | २५.०७.२०१६ | कै. राजेंद्र अण्णा साकळे | श्रीमती शंकूतला अण्णा साकळे, पलासखेडे | ५००००.०० |
| १० | २५.०७.२०१६ | कै. वैभव संजय पाटील | श्रीमती आशाबाई संजय पाटील, गोळगोर | ११०००.०० |
| ११ | २५.०७.२०१६ | कै. श्रीराम खंडू राठोड | श्री. खंडू मांगो राठोड, एरंडोल | ५००००.०० |
| १२ | २७.०२.२०१७ | कै. किशोर विश्वनाथ कोळी | श्रीमती संगीता किशोर कोळी | ५००००.०० |
| १३ | २७.०६.२०१७ | कै. निवृत्ती भागवत पाटील | श्रीमती मंगलाबाई पाटील | ५००००.०० |
| १४ | २०.१०.२०१८ | कै. विजय कोल्हे | श्रीमती कविता विजय कोल्हे | ५००००.०० |
| १५ | ११.०४.२०१९ | कै. उमेश संजय वारुळे | श्रीमती वर्षा संजय वारुळे | ५००००.०० |

## तन, मन, धनाचे मानकरी

**कै. प्रा. शालिग्राम नवलराम पाटील व श्रीमती जिजाबाई शालिग्राम पाटील**
यांनी अद्ययावत इमारत साधारणपणे १००० स्केअर फूट बांधकाम केलेले अंदाजे ३५ ते ४० लाख रुपये किंमतीचे हॉस्पिटल चालविण्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा, जळगावला दान केले असून हे हॉस्पिटल पाटील धर्मार्थ दवाखाना या नावाने रुग्णसेवा करीत आहे.

**कै. डॉ. उल्हास कडूसकर यांनी रकम रु.४०,०००/= देणगी**
सदर देणगी त्यांनी त्यांचे सासू आई - श्रीमती सरला दाते या नावाने देणगी दिली. देणगी मुदत ठेवीत ठेवून त्यावर दर वर्षी प्राप्त होणारे व्याजातून वर्षभरात उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना बक्षीसाची रकम अदा करून सन्मानित करण्यात यावे.

### १) जीवनदान योजना अहवाल वर्षातील देणगीदाते

| अ.नं | देणगीदात्यांचे नाव | स्मरणार्थ / प्रीत्यर्थ | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मी छाया इलेक्ट्रिकल्स | -- | ५०००.०० |

### २) भावस्पर्श योजना - अहवाल वर्षातील देणगीदाते

| अ.नं | देणगीदात्यांचे नाव | स्मरणार्थ / प्रीत्यर्थ | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती सारीका उमेश गुजराथी | -- | १०००.०० |

### ३) साहित्यरूपी व आर्थिक देणगीदाते-

| अ.क्रं. | नाव | अ.क्रं. | नाव |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी - मुंबई | २ | महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद - मुंबई |
| ३ | श्री. पंकज भैय्या - आर्किटेक्ट | ४ | प्रा. शेखर सोनाळकर - सोनाळकर अकॅदमी, जळगाव |
| ५ | श्री. अनिलभाऊ कांकरीया, नवजीवन सुपरशॉप - जळगाव | ६ | श्री. रमेशभाई चांदिवाल - चांदिवाल मेडिको, जळगाव |
| ७ | विश्वनाथ आर. पाटील ज्वेलर्स, जळगाव | ८ | श्री. धीरज अग्रोया व परीवार, जळगाव |
| ९ | बियाणी पॉलीमर्स, जळगाव | १० | बिबा एंटरप्रायजेस, जळगाव |
| ११ | रोटरी क्लब कल्याण | १२ | रोटरी क्लब जळगाव वेस्ट |
| १३ | अण्णासाहेब सागरमल सांखला अर्बन को-ऑपरटीव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, जळगाव | १४ | न्यू ईरा अडेसिव्ह अँड सीलंट प्रायव्हेट लिमिटेड |

### ४) यांचे मिळाले बहुमोल सेवाभावी सहकार्य

| अ.क्रं. | नाव | अ.क्रं. | नाव |
|---|---|---|---|
| १ | इंडियन रेडक्रॉस सोसायटी राष्ट्रीय शाखा, नवी दिल्ली | २ | इंडियन रेडक्रॉस सोसायटी महाराष्ट्र राज्य शाखा मुंबई |
| ३ | महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ब्लड बँक, महाराष्ट्र | ४ | मा.डॉ. पी.पी. पाटील - कुलगुरू उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| ५ | मा. जिल्हाधिकारी कार्यालय - जळगाव | ६ | ई.पी.एफ. ऑफिस जळगाव व नाशिक |
| ७ | मा. सह. आयुक्त अन्न व औषध प्रशासन - नाशिक | ८ | मा. सहाय्यक. आयुक्त अन्न व औषध प्रशासन - जळगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | मा. आयुक्त महानगरपालिका - जळगाव | १० | झोनल रेल्वे ट्रेनिंग इंस्टिट्यूट, भुसावल |
| ११ | मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद जळगाव | १२ | मा. जिल्हा शल्य चिकीत्सक सामान्य रुग्णालय व रक्तपेढी - जळगाव |
| १३ | मा. जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय - जळगाव | १४ | रक्त संक्रमण अधिकारी - जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढी |
| १५ | श्री. संजय पहुरकर - डापकू कार्यालय, जळगाव | १६ | केशव स्मृति प्रतिष्ठान संचालित माधवराव गोळवलकर रक्तपेढी- जळगाव |
| १७ | श्री. भवरलाल अँड कांताबाई मल्टीपर्पज फाउंडेशन - जळगाव | १८ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत विद्यालय, महाविद्यालय |
| १९ | मा.जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय - जळगाव | २० | मा. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव |
| २१ | मा. केंद्र निर्देशक, आकाशवाणी - जळगाव | २२ | इंडियन मेडिकल असोसिएशन - जळगाव |
| २३ | सी.ए. श्री. परीक्षित भदादे भदादे लाहोटी अँड कंपनी चार्टर्ड अकाऊंटंट | २४ | श्री. राघवजी सतरा - जळगाव |
| २५ | जाणीव बहूद्देशीय संस्था, जळगाव | २६ | पांझरा पोळ संस्थान, जळगाव |
| २७ | श्री. गजानन जाधव - समीर एंटरप्रायजेस | २८ | श्री. सलीमभाई अब्दुल मजीद मेमन |
| २९ | डॉ. रितेश पाटील - रामानंदा होमेओपॅथी क्लिनिक, जळगाव | ३० | डॉ. कल्पेश गांधी - जळगाव |
| ३१ | अँड. गोविंद जानकीराम तिवारी | ३२ | जैन उद्योग समूह, जैन इरीगेशन, जळगाव |
| ३३ | श्री श्री एंटरप्रायजेस, पुणे | ३४ | कपिल मेडीकल्स, जळगाव |
| ३५ | सौ. हर्षाली चौधरी - दिव्यांग प्रशिक्षण केंद्र, जळगाव | ३६ | टेरिमो पेनपॉल, पुणे |
| ३७ | स्ट्राईड सॉफ्टवेयर, औरंगाबाद | ३८ | मनोज आर्ट, जळगाव |
| ३९ | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, जळगाव | ४० | भारतीय दूर संचार निगम, जळगाव |
| ४१ | श्री. आर. बी. पाटील - माहिती अधिकार प्रशिक्षक | ४२ | श्री. श्रीकांत सारोळकर - इलेक्ट्रिकल इंजीनियर |
| ४३ | श्री. संजय विशवनाथ पाटील पाटील - बांधकाम ठेकेदार | ४४ | श्री. मुकुल नरेंद्र मुंदडा - फोटोग्राफर |
| ४५ | विजय टेंट हाऊस, जळगाव | ४६ | श्री. आनंद मल्हारा |
| ४७ | श्री. अविनाश भगवान चव्हाण - जळगाव | ४८ | लोकशीही मिडीया समुह |
| ४९ | श्री. दिनेश चौधरी - ऑनलाइन नोंदणी अन्न व औषध प्रशासन | ५० | अँड. एम.बी.मोयखेडे |
| ५१ | श्री. राजू माहाराज - केटरर्स, जळगाव | ५२ | श्री. प्रशांत पाटील, ई.पी.एफ. |
| ५३ | सौ. ममता राठी - द क्रिएशन - जळगाव | ५४ | स्वामी इन्व्हेस्टीगेशन सिक्युरीटी सर्विसेस |
| ५५ | आर.के. क्रिएशन | ५६ | मुद्रा ग्राफिक्स, जळगाव |
| ५७ | श्री. रतनलाल पुनमचंद टाक - इलेक्ट्रिकल वर्क | ५८ | सेंट टेरेसा कॉन्व्हेंट इंग्लिश मीडियम स्कूल, जळगाव |
| ५९ | श्री. जगदीश बींद्राप्रसाद गुप्ता | ६० | कॉम्प्युटर बिम, जळगाव |
| ६१ | युवाशक्ती फाऊंडेशन | ६२ | मेडिकल स्टोअर्स असोसिएशन, जळगाव |
| ६३ | श्री. सचिन नगीनचंद चोरडिया | ६४ | श्री. शरद धोंडू ठाकरे |
| ६५ | उज्वल स्प्रौउटर इंटरनॅशनल स्कूल, जळगाव | ६६ | माय एफ.एम. - जियो दिलसे |
| ६७ | श्री. विशाल सोनकूळ - सागरमित्र संघटना, सामनेर | ६८ | प्रशांत भागवत पाटील |
| ६९ | श्री. महेश अशोक जैन - विमा प्रतिनिधी, द न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी | ७० | सर्व प्रिंट मीडिया दैनिक व साप्ताहिकांचे संपादक, आणि प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक मिडिया आणि प्रतिनिधी |

रजि. नं. ई २१ दि. १३/०७/१९५३

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

रेडक्रॉस भवन, सिव्हिल हॉस्पिटल शेजारी, जळगाव-४२५००१
फोन नं. ०२५७- २२२६२३३,२२३५८५५,२२३६२५५; email - ircs_jal@yahoo.in ircs1953@gmail.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ( सभा क्रं ६0 )

दिनांक : १२ /११ /२०१९
वार : मंगळवार

प्रति,
सन्माननिय सभासद
सप्रेम नमस्कार,

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव, सन २०१८-२०१९ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक - ०१, डिसेंबर, २०१९ रोजी सकाळी ठीक - १०.३० वाजता संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा. डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.) यांचे अध्यक्षतेखाली, रेडक्रॉस भवन, न्यू बी.जे.मार्केट शेजारी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, जळगाव येथे आयोजित केली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**- सभेचे विषय -**

१) दिवंगताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणे.
२) सोमवार दिनांक - २९/१०/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) आर्थिक वर्ष २०१८ - २०१९ चा रेडक्रॉस, रक्तपेढी, जेनेरीक मेडिसीन प्रकल्प, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पाटील धर्मार्थ दवाखाना, आधार व ई सेतु सुविधा केंद्र आणि विविध उपक्रमांचा वार्षिक कामकाजाचा कार्यअहवाल सादर करणे.
४) आर्थिक वर्ष २०१८ - २०१९ चे अंकेक्षित नफा तोटा पत्रके व ताळेबंद सादर करून मंजूरी घेणे.
५) आर्थिक वर्ष २०१९ - २०२० करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज पत्रक (कार्यकारिणीने मंजूर केलेले ), सादर करून मंजूरी घेणे.
६) आर्थिक वर्ष २०१९ - २०२० करिता ऑडिटरची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरवीणे.
७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

**टीप-**

१) कोरम अभावी सभा तहकूब करण्यात येईल, तहकूब सभेचे कामकाज नियमाप्रमाणे अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सुरू होईल अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) आर्थिक वर्षातील हिशेबाच्या व्यवहारासंबंधीचे किर्द, खतावण्या, पावत्या, तपासणी अहवाल सोमवार दि.२५/११/२०१९ ते शुक्रवार २९/११/२०१९ पर्यंत दुपारी २ ते ५ या वेळात सभासदांनी लेखी मागणी केल्यास प्रशासकीय कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल.
३) कृपया सभेस येतांना अहवाल सोबत आणावा ही विनंती.
४) फक्त सभासदांनाच सभेस उपस्थित राहता येईल तसेच संस्था सभासदांच्या प्रतिनिधींनी आपले अधिकार पत्र सोबत आणणे गरजेचे आहे.
५) सभेसंबंधी आपल्या काही सूचना किंवा आयत्या वेळेच्या विषयांसाठी विषय असल्यास कृपया लेखी स्वरुपात शुक्रवार दि.२९/११/२०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत ही विनंती.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **विनोद बियाणी** | **गनी अ. मेमन** |
| मानद सचिव | उपाध्यक्ष |

**गरीब गरजू रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठ्याकरिता संस्थेच्या जीवनदान या सेवाभावी योजनेत देणगी स्वीकारण्याची व्यवस्था सभेच्या ठिकाणी केली आहे. थँलेसेमिया बालक दत्तक योजनेतही आपण सहभागी होऊ शकता. (धनादेशही स्वीकारले जातील)**

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

## वार्षिक अहवाल

**सन्माननिय सभासद आणि आमचे आश्रयदाते,**

सर्व प्रथम मी आपणा सर्वांचे कार्यकारिणीच्या वतीने मन:पूर्वक स्वागत करतो आणि हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. आपल्या संस्थेच्या ०१ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ पर्यंतचा वार्षिक अहवाल, नफा तोटा पत्रके, ऑडिटेड ताळेबंद आपल्यासमोर सादर करतांना मनस्वी आनंदच होत आहे.

जळगाव जिल्हा रेडक्रॉस सोसायटी ही आंतरराष्ट्रीय आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटीची संलग्न संस्था आहे आणि मानवतावादी सेवाभावी या मूळ उद्धेशांशी ईमान राखून तसेच सेवा... स्नेह... समर्पण या भावनेतून लोकाभिमुख कार्य करीत असून अव्याहतपणे आम्ही या संस्थेव्दारे कार्य करीत राहणार आहोत. हे कार्य करीत असतांना आमच्यावर लोभ असणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक, देणगीदार, हितचिंतक, रक्तदान शिबीर आयोजक, अनेक समाजसेवी संस्था, अशासकीय सेवाभावी संस्था, रेडक्रॉस अंतर्गत कार्यरत सर्व संबंधित कर्मचारी, अधिकारी, त्याचप्रमाणे पत्रकार, तज्ञ डॉक्टर्स आणि रेडक्रॉसचे सर्व सभासद, कार्यकारिणी सदस्य व पदाधिकारी यांचे बहुमोल सहकार्य मिळत आहे.



रेडक्रॉस ही अनेक लोकाभिमुख विविध उपक्रम राबविण्याकरिता अधिकृत विद्यापीठच आहे. आपले लक्ष्य होते की सुसज्ज सर्व सुविधांनी युक्त, अत्याधुनिक तंत्रज्ञानावर चालणारी भव्य अशी रेडक्रॉसची वास्तु असावी. तर हे लक्ष्य आपण साध्य केले आहे. आज १०००० स्केअर फूटची वातानुकूलित दुमजली इमारत रेडक्रॉस भवन नावारूपाला आली आहे. यात शंभर आसनी सभागृह, ४० किलो व्हॅट सोलर सिस्टम, १२५ के.व्ही.ए. क्षमतेची पॉवरिका डिझेल जनरेटर सेट, छोटीशी लिफ्ट, रोष कंपनीची नॅट टेस्टेड मशीनरी असलेले दालन असून तेथे कार्यरत असलेले कुशल तंत्रज्ञ, रक्त संक्रमण अधिकारी इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागाने वर्षभर चोवीस तास सेवा देणारी रक्तपेढी रूग्णांच्या सेवेसाठी उपलब्ध आहे.

रेडक्रॉस भवन मध्येच सर्व नागारिकांना ई सेतु व आधार सुविधा केंद्र सुरू करण्यात आले असून ह्याचा लाभ सर्व सामान्य जन उत्स्फूर्तपणे घेत आहेत.

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जाहीर केल्याप्रमाणे वाघ नगर येथे १५४८ स्केअर फूट जागेपैकी १००० स्केअर फूट बांधकाम केलेले सर्व सोयीयुक्त हॉस्पिटल - रेडक्रॉसच्या अधिपत्याखाली प्रा. शालिग्राम पाटील व श्रीमती जिजाबाई पाटील यांच्या दातृत्वाने पाटील धर्मार्थ दवाखाना, वाघ नगर, जळगाव येथे रुग्णसेवेसाठी लोकार्पण करण्यात आलेला आहे. त्यात सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर जयप्रकाश खडसे, डॉक्टर वासुदेव मावळे, डॉ. प्रभा बडगुजर, परिचारिका श्रीमती इंदिरा जाधव व श्री. अमोल पाटील रुग्णसेवा प्रदान करीत आहेत.



आपल्या सर्वांच्या उत्स्फूर्त योगदानामुळेच रेडक्रॉसला इतके बहुरंगी कार्यक्रम आणि विविध उपक्रम राबविणे शक्य होत आहे.

अहवाल वर्षात ध्वजारोहण आपल्या रेडक्रॉस भवन प्रांगणात संपन्न झाले असून आपण या वर्षी आपल्या नवीन वास्तुमधूनच वार्षिक अहवाल प्रसिद्ध करीत आहोत.

अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज, विविध उपक्रमांच्या समित्यांची स्वतंत्र दालने, प्रशस्त रक्तपेढी, देखणे सभागृह असलेली ही वास्तु जनसेवेसाठी लोकार्पण करण्यात आलेली आहे. आज महाराष्ट्रातील एक प्रथम श्रेणीची रक्तपेढी, अव्वल दर्जाचे दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जेनेरिक औषध विक्रीची शृंखला, निरंतर आरोग्य शिक्षणाच्या सोयी, गरजू रुग्णांना थेट उपयोगी पडतील अशा शिबिरांचे निरंतर आयोजन अशी बहुविध सेवाकार्ये सुरू आहेत व सातत्याने सुरू राहणार आहेत ते आपल्या सर्वांच्या पाठबळानेच ! आपले सहकार्य व आपले

संस्थेवरील प्रेम हेच संस्थेच्या प्रगतीचे गुपित आहे हे मला प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते.

**लोकसेवेचा वसा घेतला हाती ! त्यात आपण सर्वजण माझे साथी !!**

अहवाल वर्षात आपण ल्युको रीडक्शन मशीन व्दारे निर्मित ल्युको रीड्यूसड बॅग तसेच नॅट टेस्टेड मशीन व्दारे तपासणी केलेले अति गुणवत्ता युक्त रक्तघटक आपण जळगाव जिल्ह्यात रुग्णांना पुरविण्यास सुरुवात केलेली आहे व त्यास सर्व नामांकित हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. या अति प्रगत तंत्रज्ञानामुळे रक्ताच्या पिशवी मधील पांढऱ्या पेशी काढल्या जातात. त्याबरोबर निरुपयोगी घटक, घातक विषाणू व दूषित जंतुसंसर्ग बाहेर काढल्या गेल्यामुळे रक्त अधिक सुरक्षित व शुद्ध होते. अर्थातच यामुळे अपाय टळतात. तसेच नॅट टेस्टेड मशीन व्दारे तपासणी केलेले आणि गुणवत्ता युक्त रक्तघटकाच्या वापरामुळे घटक आजार संक्रमणीत होण्याचे प्रमाण नगण्य ठेवण्यात आपण हळू हळू यशस्वी होत आहोत.



ऑटोमेटेड एलायझा रीडर मशीन, या अद्ययावत स्वयंचलित यंत्रामुळे विंडो पिरीयड कमी होतो. सुस्त विषाणूंचा सुगावा लवकर लागू शकतो. रक्त संक्रमणातून त्यांचा संसर्ग होण्याचा संभव अतिशय कमी होतो.

आपल्याकडे टेरिमो कंपनीचे व स्पॅन हेल्थ केयर कंपनीचे प्रत्येकी एक एस.डी.पी. मशीन कार्यरत आहे. त्यात फिल्टरची सुविधा असून, डेंग्यू मलेरिया, प्लेटलेट पेशी कमी होणारे आजार याची संख्या वाढलेली आहे. या सर्व आजारात द्यावे लागणारे सिंगल डोनर प्लेटलेट तयार करणारे हे यूनिट आहे. तसेच महाराष्ट्रात अग्रस्थानी थॅलेसेमिया रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा सेवा रेडक्रॉस रक्तपेढीमार्फत सिकल सेल व थॅलेसेमिया बाधीत मुले व मुलींना सन २००७ ते २०१८ – २०१९ वर्ष अखेरपर्यंत एकूण १४०२६ व अहवाल वर्षात १६४९ रक्त घटक विनामूल्य पुरविण्यात आले. रेडक्रॉस रक्तपेढी ही जळगाव जिल्ह्यात रुग्णांना जिल्ह्यातील एकूण मागणीच्या ७० ते ७५ टक्के रक्त व रक्तघटक पुरवठा करते. जळगाव रेडक्रॉस राज्य शाखेला महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने रक्त व रक्त घटक वितरण करणारी रक्तपेढी म्हणून राज्य शाखेच्या न्यूज बुलेटीन मध्ये आकडेवारीसह प्रसिद्ध करून गौरवान्वित करण्यात आले आहे.

रेडक्रॉस रक्तपेढीमार्फत रक्तदात्यांतर्फे झालेले रक्तदानाचे १००% ऑटोमेटेड एलायझा मशीन व्दारे बायो रॅड कंपनीचे फोर्थ जनरेशनच्या कीट्स मार्फत चाचणी केली जाते व जगातील ९९.९ टक्के सुरक्षित रोष कंपनीचे नॅट टेस्टेड मशीन व्दारे रक्ताची चाचणी केली जाते. या टेस्ट अतिशय महागड्या असून बहुतांश रक्तपेढ्या या तंत्रज्ञानाचा वापर करीत नाही. म्हणून रेडक्रॉस रक्तपेढीकडे सिकल सेल व थॅलेसेमियाबाधीत रुग्णांचा व इतर रुग्णांचा रक्तघटक घेण्याचा ओघ दिवसेंदिवस वाढतच आहे.




रक्तदान वर्षात ज्या रक्तदात्यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला त्यांना रक्तदाता विमा पॉलिसी अंतर्गत अपघात विम्याची रकम अदा करण्यात आली. म्हणूनच रेडक्रॉस ही लोकसेवेचा आत्मा आहे की ज्यामुळे रंजलेले गांजलेले, दु:खी, पीडित व वंचित समाजाला मदतीचा हात मिळतो व रक्तदाते हे रक्तपेढीचे प्राण आहे कारण त्यांच्या अव्याहतपणे करीत असलेल्या रक्तदानामुळेच प्रत्येक वेळी चार जिवांचे प्राण वाचवण्यास मदत होते. महाराष्ट्र राज्य एड्स कंट्रोल सोसायटी, नॅशनल एड्स कंट्रोल सोसायटी, जिल्हा शासकीय रुग्णालय, समाजसेवक, देणगीदाते, रेडक्रॉसचे चाहते, स्वयंसेवक, भेट देणारे मान्यवर, उपक्रमास मदत करणाऱ्या समाजसेवी संस्था, शासकीय व निम शासकीय कार्यालये, अधिकारी वर्ग, वृत्तपत्र समुह, प्रसारण माध्यम, मिडिया, मार्गदर्शक, सर्व हितचिंतक हे रेडक्रॉसचा पाठीचा कणा आहे.

**आशा करू या ....**
**रुग्णसेवा.. ही वैश्विकसेवा... साध्य करण्यासाठी, लाभत आहे धन्वंतरीची साथ !**
**त्यामुळेच ....**
**गुणवत्तायुक्त रक्तघटक मागणीस, जनसमुदायाकडून मिळत आहे प्रतिसाद !!**
**गरजूंना मदतीचा हात या दृष्टीने रेडक्रॉसने केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे...**

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग अंतर्गते दिव्यांगांच्या सर्वांगिण पुनर्वसनार्थ जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र हे जिल्हास्तरावरील केंद्र हे इंडियन रेडक्रॉस सोसायटीने माहे जानेवारी २०१८ पासून मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा व्यवस्थापन समिती, डीडीआरसी व अध्यक्ष, इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या मान्यतेने चालविण्यास हाती घेतले आहे. सदर केंद्रामार्फ़त जिल्ह्यातील दिव्यांगांचे शारिरीक, मानसिक, आर्थीक, शैक्षणीक व सामाजिक पुनर्वसनाचे कार्य चालते. त्या अंतर्गत दिव्यांगांना सहाय्यक साहित्य उपलब्ध करुन देणे, त्यांना स्पिच थेरेपी, सायकोथेरेपी, फ़िजीयोथेरेपी इ. सेवा देणे. तसेच त्यांचे पालकांचे समुपदेशन करणे त्यांना सल्ला व मार्गदर्शन करणे मेळावे, शिबीरे आयोजीत करुन त्यांना आवश्यकतेनूसार शासनाच्या मदतीने, संस्थेच्या मदतीने सेवा- सुविधा उपलब्ध करुन देणे इ. कार्य करण्याचे सुरु आहे.

रेडक्रॉस तर्फे जागतिक लसीकरण दिनानिमित्त शाळेतील मुलींना रुबेला वॅक्सीनेशन देण्यात आले.

धर्मार्थ दवाखान्यात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी दिवसभर मोफत लसीकरण केले जाते. लहान मुले, गर्भवती महिलांना याचा लाभ होतो. महानगरपालिकेच्या वतीने लसीकरणाची सोय केली जाते. आजूबाजूच्या परिसरातील सर्व गोर गरीब रुग्ण पाटील धर्मार्थ दवाखान्यात रुग्ण सेवा व लसीकरणाचा लाभ घेत आहेत.

जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोग विशेषज्ञ यांची व्याख्यान मालिका ठिकठिकाणी आयोजित करण्यात आली. विविध स्तरातील नागरिकांनी याचा लाभ घेतला.

प्रथमोपचार प्रशिक्षण शासकीय, निम शासकीय कार्यालये, कंपन्या, कारखाने इत्यादि ठिकाणी कामगारांना आवश्यक लागणारे मान्यता प्राप्त प्रथमोपचार प्रशिक्षणाचे वर्ग आयोजन करून कर्मचारी व कामगारांना तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत कोल्हापूर व सांगली येथील नदीच्या पुरामुळे आपादग्रस्तांना रेडक्रॉस सोसायटी मार्फत ५०० नग चटई, (२० भांड्यांचे एक सेट) या प्रमाणे १३६ भांड्यांचे सेट, २०० साडी, ९६ थ्रेप्टिन प्रोटिनयुक्त बिस्किट डबे व इतर समाजसेवी अण्णासाहेब सागरमल सांखला अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी व न्यू इरा अँडेसिव्ह अँड सिलंट, जळगाव यांच्या सहयोगाने ११० पाणी पिण्याचे बॉक्स, ५० किलो खाकरा व ४० किलो लोणचे डबे पाठविण्यात आले, त्या बाबत मा. नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील महसूल मंत्री (महाराष्ट्र राज्य) व पालक मंत्री (कोल्हापूर) यांनी पत्र पाठवून रेडक्रॉसच्या कार्याचे कौतुक व अभिनंदन केले.

राज्य शाखेकडून प्राप्त कपडे, भांडे सेट, चटई, साडी, टॉवेल इत्यादिचे वाटप आदिवासी भागातील गोरगरीबांना ज्यांचा संसार उघड्यावर आहे, जे समाजापासून दूर जंगलात राहतात, ज्यांच्या कुटुंबियामध्ये शिक्षणाचा अभाव आहे अशा वंचित व दुर्लक्षित भागात धुळे पाड्यात जाऊन वाटप करण्यात आले. तसेच जळगाव झोपडपट्टी भागात आग लागून घरे भस्मसात झालेल्या कुटुंबियांना अशीच मदत करण्यात आली.

डेंग्यु निर्मूलनाकरिता जनजागृती म्हणून शहरातील वर्दळीच्या ठिकाणी डेंग्यु होऊ नये म्हणून घ्यावयाची खबरदारी यांचे माहिती फलक महानगरपालिकेच्या सहकार्याने लावले.

महानगर पालिकेने आयोजित केलेल्या व आवाहन केलेल्या महास्वच्छता व प्लॅस्टीक मुक्त अभियानाअंतर्गत ५० रेडक्रॉस स्वयंसेवक व कार्यकारिणीने बी.जे. मार्केट परिसर स्वच्छ केला. महानगरपालिकेला १००० हॅन्ड ग्लोव्हज, खराटे इत्यादि साहित्य पुरविले. तसेच जळगाव शहरातील विविध शाळेचे विद्यार्थी वर्षभर घरातील रिकामे प्लास्टिक कचरा आणून शाळेत जमा करतात. या अंतर्गत आता पर्यंत ४० ते ५० शाळेतील विद्यार्थ्यांनी या अभियानात सहभाग नोंदवला आहे. प्लास्टिक मुक्त भारत या संकल्पनेला हातभार लावण्यासाठी श्री. विशाल सोनकुळ - सागरमित्र, सामनेर यांच्या सहयोगाने रेडक्रॉस मार्फत वाहन पाठवून प्लास्टिक केरकचरा जमा केला जातो व त्याची योग्यरीत्या नियमितपणे विल्हेवाट केली जाते.

गणपति विसर्जनाच्या वेळी निर्माल्य जमा करून त्याची विल्हेवाट योग्य ठिकाणी लावणे. विसर्जन मिरवणुकीत जे भक्त जखमी झाले त्यांना वेळीच प्रथमोपचार करणे इत्यादि कार्य रेडक्रॉस स्वयंसेवकांनी केले.

पर्यावरण सरंक्षणासाठी झाडे लावा, झाडे जगवा या अंतर्गत संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले.

**अहवाल वर्षात रेडक्रॉस व रक्तपेढीला मिळालेला सन्मान ....**

१) १ मे या महाराष्ट्र दिनी राज्याचे कृषि राज्यमंत्री श्री.सदाभाऊ खोत यांच्या हस्ते जिल्हास्तरीय युवा पुरस्कार आपल्या रेडक्रॉस जळगाव शाखेला प्रदान करण्यात आला.

२) ११ मे रोजी अखिल महाराष्ट्रातून सर्वोकृष्ट शाखा म्हणून निवड झाल्याबद्दल राजा महाराजासिंग फिरता चषक व स्मृतिचिन्ह महाराष्ट्र राज्याचे चेअरमन श्री. के.एम. घेरडा यांच्या हस्ते प्राप्त झाला.

३) २१ मे रोजी राज्यातील पहिली दिव्यांग साहित्य वाटपाचे आयोजन आमदार फंडातून करण्याचा बहुमान आपल्याला मिळाला. सहकार राज्यमंत्री मा. ना. श्री. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.

रेडक्रॉसचे स्वत:चे असे काही खास दिवस उत्साहाने साजरे करतो. त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

८ मे हा जागतिक रेडक्रॉस दिन आमच्या जिव्हाळ्याच्या दिवस ध्वजारोहण, सिकलसेल व थॅलेसीमियाग्रस्त बालरुग्णांना मनोरंजनासाठी रेडक्रॉस भवन सभागृहात जादूचे प्रयोग, सामूहिक नृत्य, विविध खेळ, गीत, कविता सादरीकरण, झाशीची राणी चित्रपट, बाल रोग तज्ञ नामांकित डॉक्टराकडून ब्रोन मॅरो ट्रान्स्प्लांटसाठी मार्गदर्शन, घ्यावयाची काळजी इत्यादिबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुलांना कुटुंबियासमवेत चहा - नाश्ता, जेवण, थ्रेप्टिन पोषक आहार डबे व रक्तवाढीचे औषध वाटप, कपडे, भांड्यांचा सेट, चटई, खेळणी इत्यादिचे वाटप करण्यात आले.

एच.आय.व्ही. बाधीत गुणवंत विद्यार्थ्यांना समाजसेवी बांधवांच्या सहकार्याने पुस्तके, वही व दप्तर, कपडे, चटई, भांड्यांचा सेट वाटप करण्यात आले.

रेडक्रॉस भवन सुशोभीकरण, लायटिंगने सजवून - जळगाव रेडक्रॉस दिन १३ जुलै रोजी रेडक्रॉस भवन सभागृहात ६६ वा वर्धापन दिन - रेडक्रॉस ध्वजारोहण व गीत सादरीकरण, रेडक्रॉस व रक्तपेढी कर्मचारी समवेत रेडक्रॉस कार्यकारिणी व पदाधिकारी यांचे समवेत कौटुंबिक सोहळा विविध गायन. मनोरंजन कार्यक्रमाचे व स्नेहभोजनाचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

जागतिक रक्तदाता दिन १४ जून रोजी विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करून व रक्तदात्यास शुभेच्छा देऊन साजरा करण्यात आला.

१३ जुलै २०१९ रोजी जळगाव रेडक्रॉस स्थापना दिन साजरा केला जातो. रेडक्रॉसचे अंतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र व पाटील धर्मार्थ दवाखाना कर्मचारी तसेच रक्तपेढीचे सर्व कर्मचारी यांनी एकत्र येऊन गेट टुगेदर कार्यक्रम रेडक्रॉसचे कार्यकारिणी व पदाधिकारी समवेत साजरा केला.

या व्यतिरिक्त अहवाल वर्षात असे अनेक लोकाभिमुख सेवाभावी उपक्रम रेडक्रॉस मार्फत राबविण्यात आले त्याची स्वतंत्र यादी व छायाचित्र अहवलात दिलेले आहे. गेल्या वर्षातील कार्याचा आर्थिक व्यवहारांचा धावता आलेख आपल्यापुढे थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या व्यतिरिक्त एक खिडकी योजना, मोबाईल वातानुकूलित व्हॅन रक्तदात्यांच्या दारी, गरीब रुग्णांसाठी विनामूल्य रक्ताची पिशवी पुरवठ्यासाठी जीवनदान व भाव स्पर्श योजना, जेनेरिक औषधींची स्वस्त औषध विक्रीची दुकाने इत्यादि उपक्रम नेहमीप्रमाणे चालू आहे.

रक्तदात्यांसाठी विम्याची रक्कम प्रत्येक रक्तदानाच्या वेळी ५० हजार रूपये रकमेचा रक्तदाता अपघात विमा पॉलिसी उतरविण्यात येते. रेडक्रॉस सोसायटीच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि नवीन वास्तुमध्ये स्थलांतर झाल्यामुळे महाराष्ट्रात रेडक्रॉस रक्तपेढी ही अग्रगणी स्थानात गणली जाऊ लागली आहे. रेडक्रॉस रक्तपेढीमध्ये रक्त संक्रमण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहायक, जन संपर्क अधिकारी इत्यादिची मोठ्या प्रमाणात नियुक्ती करण्यात आलेली आहे आणि त्यामुळेच रेडक्रॉस रक्तपेढीचे कार्य अधिक जोमाने वेग घेत आहे.

आपल्या सर्वांच्या सदिच्छांच्या बळावर व भक्कम पाठिंब्यामुळे हे सर्व प्रकल्प, उपक्रम आणि वर्तमान काळातील तसेच भविष्यकालीन नव नवीन योजना आपण सर्व मिळून नेटाने चालवू अशी आपल्याला ग्वाही देतो. आपल्या मार्गदर्शक सूचना, सुधारण्याबाबत शिफारशी अवश्य कळवाव्यात. त्यांचे स्वागतच होईल, आपला सक्रिय सहभागही अतिशय मोलाचा असेल आणि त्यांची अंमल बजावणी करण्यात आम्हाला आनंदच होईल.

आर्थिक वर्ष सन २०१८ ते २०१९ चे जमा खर्चाचे लेखापरीक्षण ऑडिटर सी.ए. श्री. परीक्षित भदादे यांनी वेळेत पूर्ण केले. संस्थेच्या सर्व कामकाजात रेडक्रॉस रक्तपेढीशी निगडीत असलेले शासकीय उच्च पदस्थ कार्यरत अधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना केल्या व त्यांची कार्यकारिणीच्या सहकार्याने पूर्तता केली आहे. सर्व कार्यकारिणी सदस्यांचा योग्य सहभाग मिळत आहे या सर्वांचे तसेच संस्थेच्या विकासात विविध उपक्रमांना व दैनंदिन कामकाजास मान्यवरांनी हितचिंतकांनी सेवा भावी संस्था संस्थेचे सन्माननीय सभासद, रक्तपेढीचे वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, प्रशासनातील अधिकारी, जन संपर्क अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी मोलाचे सहकार्य दिले त्या बद्दल या सर्वांचे आभारी आहोत. एवढे सांगून मी आपली रजा घेतो.

**जय हिंद .... जय महाराष्ट्र.....**

**विनोद बियाणी**
मानद सचिव

**डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

## रक्तपेढी अहवाल

**रक्तपेढी समितीतर्फे आपणा सर्वांचे शुभचिंतन !**

**मानवता के सेवक है हम,सेवा हमारा धर्म है...**
**दिन दु:खियों के दुख को दूर करना हमारा कर्म है...**

या उक्तीप्रमाणे रेडक्रॉस अविरतपणे सेवा कार्य करीत आहे. रेडक्रॉस रक्तपेढीने मागील वर्षात रक्तदानाच्या सेवाकार्यात अतिशय उत्कृष्ट कार्य केले. माहे जानेवारी २०१९ ते जून २०१९ या कार्यकाळात रेडक्रॉस रक्तपेढी ही महाराष्ट्रातील रेडक्रॉस शाखेतील रक्तपेढ्यांमध्ये **प्रथम क्रमांकाची** संकलन व वितरण करणारी रक्तपेढी ठरली आहे, याचा रक्तपेढी चेअरमन या नात्याने मला सार्थ अभिमान आहे.

संस्थेचे माजी पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री.किशोर राजे निंबाळकर (भा.प्र.से.) व विद्यमान पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.) यांच्या वेळो-वेळी सक्रिय मार्गदर्शनामुळे आज रक्तपेढी महाराष्ट्रात अव्वल स्थानावर आहे,याचे आंतरिक समाधान आहे.



१ जानेवारी २०१९ हा दिवस जळगाव रेडक्रॉसच्या इतिहासात सुवर्णाक्षणाने लिहिला जाणारा असा दिवस आहे. या दिवशीच आपण तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.किशोर राजे निंबाळकर यांच्या अनमोल मार्गदर्शन व पदाधिकारी तसेच कार्यकारिणी सदस्यांच्या अथक प्रयत्नातून अत्याधुनिक आणि भव्य, सुसज्ज वास्तूमध्ये**(रेडक्रॉस भवन)** नव्या जोमाने सेवेला सुरुवात करू शकलो, ही आपल्या सर्वांसाठी गौरवाची बाब आहे.

२४ तास तत्पर रुग्णसेवा, निरंतर रक्तदानाचा प्रचार,प्रसार, जनजागृती, संपर्क, मेळावे, सोशल मिडिया, मोबाइल ब्लड डोनर व्हॅनच्या माध्यमाने शहरासोबत ग्रामीण भागात **'रक्तपेढी आपल्या दारी'** ही संकल्पना राबवीत आहोत.

गेल्या सहा वर्षांपासून प्रत्येक रक्तदात्याला रु.५०,०००/- चे अपघाती विमा संरक्षण, सोबत आप्तेष्टांना सेवा शुल्कात सूट म्हणून स्वेच्छा रक्तदान करणाऱ्या पुरुष रक्तदात्यास रु.३००/- चे सवलत कार्ड व महिला रक्तदात्यास सवलत कार्डवर पुरुष रक्तदात्यापेक्षा रु. १००/- अधिक म्हणजे रु.४००/- ची सेवाशुल्कात सवलत हे महिला सक्षमीकरण करण्याचे दृष्टीने प्रभावी पाऊल. अर्थात रक्तदात्याला स्वतःकरिता विनाशुल्क रक्त !




स्त्री वर्गाचे रक्तदानाचे अल्प प्रमाण साधारण (३% ते ५%) वाढविण्याचे दृष्टीने विविध महिला गटांची हिमोग्लोबिन तपासणी व रक्ताक्षयावर (हिमोग्लोबिनचे कमी प्रमाण) मार्गदर्शन म्हणून शिबीर तज्ञ डॉक्टरांचे सहकार्य मिळत बाहे. अध्यात्मिक चळवळीतील संत निरंकारी परिवार, जळगाव येथील जैन उद्योग समूह, Z.R.T.I. (क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण केंद्र, मध्य रेल्वे, भुस-ावळ), C.R.M.S. भुसावळ, अखिल भारतीय तेरा पंथी, रोटरी क्लब, लायन्स क्लब अशा विविध धार्मिक व सामाजिक समाजसेवी संस्थांची वेळोवेळी रक्तदान शिबिर आयोजन करण्यात सक्रिय मदत होत असते.

**जीवनदान योजना :-** आर्थिदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वर्षभरातून एका रक्त पिशवीस / रक्तघटकात रक्कम रुपये एक हजार ची सवलत देवून रक्तपुरवठा करण्यासाठी देणगीदाते रु.**बारा हजाराची** देणगी देवून या योजनेत सहभागी होऊ शकतात. तसेच भावस्पर्श योजनेत रक्कम रुपये **१५००/-** मात्र देणगी दिल्यास त्यावर्षी एक गरजू रुग्णास विनामुल्य एक रक्तपिशवी देणे शक्य होते.




जीवनदान व भावस्पर्श योजनेत लोकसहभाग वाढवण्याच्या दृष्टीने व त्या माध्यमातून गरजू गरीब रुग्णास सवलतीच्या सेवा शुल्कात, विनामूल्य रक्तपिशवी उपलब्ध होण्याची चळवळ बळकट करण्यासाठी आपण सर्वांनी सांघिकरीत्या अधिकाधिक प्रयत्न करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे समजतो. या व्यतिरिक्त थॅलेसेमिया बालक दत्तक योजनेतही आपण सहभागी होऊ शकतात.

२०१८ – २०१९ मध्ये **१६४९** रक्तपिशव्या (पी.सी.व्ही.) आपण थॅलेसेमिया, सिकलसेल व अप्लास्टिक अॅनिमिया बाधित रुग्णांना विनामूल्य देण्यात आल्या व मागील बारा वर्षात रक्तपेढीने **१४०२६** रक्तपिशव्या (पी.सी.व्ही.) या रुग्णांना सेवाशुल्क न घेता दिल्या आहेत. सेवाशुल्क न घेता दिल्या गेलेल्या रक्तपिशवी (पी.सी.व्ही.) चा सेवाशुल्क **दोन कोटी** रुपयाच्या आसपास आहे, या पुण्यकर्माचा सार्थ अभिमान आहे.

२०१८ ते २०१९ मध्ये शहरी भागात= **१२०** व ग्रामीण भागात= ४० असे एकूण= **१६०** रक्तदान शिबिराचे आयोजन केले. संपूर्ण रक्ताऐवजी आवशच्यकतेनुसार रक्तघटकांचे विनियोगामुळे ८५% पेक्षाही अधिक रक्तविघटनाचे प्रमाण ही समाधानाची बाब आहे असे नमूद करावेसे वाटते.



वर्षभरात कधीकधी जाणवणारी रक्तटंचाई, विशेषत:उन्हाळ्यातील रक्तटंचाईवर प्रभावीपणे मात करण्याकरीता या वर्षी रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्ट ने २७ मे ते १५ जून पर्यन्त **रक्तपेढी आपल्या दारी** संकल्पना राबवून ८०० रक्तपिशव्या संकलित केल्या. त्यामुळे रक्तपेढी उन्हाळ्यात ही सुरळीत रक्तपुरवठा करू शकली. भविष्यात रक्तपेढीला स्ट्राईड सॉफ्टवेयर व्दारे रक्तदात्यांना व्हॉईस कॉलिंग योजनाही अमलात आणणार आहोत. रक्तसाठा कमी असतांना ही यंत्रणा प्रभावी ठरणार आहे.

रक्तपेढीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना गुणवत्तापूर्ण रक्तपुरवठा करता यावा म्हणून तंत्रज्ञ व रक्तसंक्रमण अधिकारी यांना वेळोवेळी प्रशिक्षणासाठी पाठविले.

मागील दोन वर्षात जर्मन बनावटीचे अत्याधुनिक रेफ्रीजरेटेड सेंट्रीफ्यूज, ल्युको रीडक्शन यूनिट, ऑटोमेटेड एलायझा रीडर, ट्रिमाचे एसडीपी यूनिट,बायोरॅड कंपनीचे 4th Generation kits या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार रक्तघटकाची निर्मिती आणि अधिक सुरक्षित व सर्वोत्कृष्ठ सेवा देण्याचा प्रयत्न केला असून त्यात आपण यशस्वी ही झालो आहोत. या सोबतच रक्तपेढीच्या क्षेत्रातील जागतिक पातळीवरचे उच्च तंत्रज्ञान म्हणजेच नॅट टेस्टेड तंत्रज्ञान(Nucleic Acid Test (NAT) रक्त पुरवठा करणारी संपूर्ण खानदेशातील पहिलीच रक्तपेढी म्हणून रेडक्रॉस रक्तपेढी नावारूपाला आली आहे हे आपणास सांगताना मला अतिशय आनंद होत आहे. जानेवारी २०१९ पासून रक्तपेढी मध्ये रोश कंपनीचे नॅट टेस्टेड यूनिट कार्यान्वित झाले.यासबंधी रक्तपेढीतील तंत्रज्ञानांना प्रशिक्षण देण्यात आले.



या तंत्रज्ञानामुळे सर्वाधिक सुरक्षित रक्तपुरवठा आपण करू शकतो. आपण सर्वांनी सर्वाधिक सुरक्षित नॅट टेस्टेड रक्तपिशवी व घटकांचा जाणीव पूर्वक प्रचार प्रसार करावा, ही विनंती. या सर्व उपक्रमांना व दैनंदिन कामकाजास अन्न व औषध प्रशासन विभाग, हितचिंतक रक्तदाते, रक्तदान शिबीर आयोजक, रक्त मागणी करणारे डॉक्टर, संस्थेचे सभासद, संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, रक्तपेढी समिती, सर्व कर्मचारी, ज्ञात-अज्ञात हितचिंतक, प्रसार माध्यमे यांनी मोलाचे सहकार्य दिले, त्याबद्दल सर्वांचे अत्यंत आभारी आहोत.

**डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी (एम.डी.पॅथ.)**
चेअरमन, रक्तपेढी

## नॅट टेस्ट प्रणाली हि सर्वाधीक सुरक्षित रक्तपुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रभावी पाऊल

* नॅट (NAT) म्हणजे (न्यूक्लिक ॲसिड टेस्ट) सर्वाधिक सुरक्षित रक्तपुरवठा करण्याकरिता जागतिक दर्जाचे प्रभावी तंत्रज्ञान. रक्त व रक्तघटक रक्तपेढीतून रूग्णाला देतांना एच.आय.व्ही, हेपॅटायटीस-बी, हेपॅटायटीस-सी,गुप्तरोग,मलेरिया,ई.चे रोगजंतु त्यात नसल्याची खात्री केली जाते. प्रचलित Elisa तंत्रानुसार या रोगजंतूंसाठी चाचण्या रोगांच्या प्रती जैविकांचे (Anti bodies) अस्तित्वानुसार आधारित असतात व त्यानुसार "विंडो पिरीयड" हा कालावधी महत्वाचा असतो. हा कालावधी जेवढा कमी तेवढी दिल्या जाणाऱ्या रक्तातून संसर्गाची शक्यता कमी असते. NAT या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रतीजैविका ऐवजी रक्तातील रोगजंतूंची संक्रमित जनुके (DNA-RNA) शोधून काढली जातात व संसर्गाच्या अगदी सुरुवातीच्या काळातील जंतूंचे अस्तित्व असल्यास ते अचूकपणे शोधता येते व विंडो पिरीएड कालावधी कमी होतो. त्यामुळे रक्तसंक्रमणातून विषाणूंचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी होते.

खान्देशात इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव संचलित रक्तपेढीत Fully Automated मशीन द्वारा नॅट टेस्टिंगची सुविधा उपलब्ध झाली आहे. तत्कालीन मा.जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष - **श्री. किशोरराजे निंबाळकर (भा.प्र.से)** यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे १ जानेवारी २०१९ रोजी नॅट तंत्रज्ञान रेडक्रॉस रक्तपेढीत कार्यान्वित झाले.

| महिना | लायझा टेस्टिंग | नॅट टेस्टिंग | नॅट +(Yield) संख्या |
|---|---|---|---|
| जानेवारी | ८५८ | १५२ | ० |
| फेब्रुवारी | ९१७ | २०३ | ० |
| मार्च | ७५३ | १२५ | ० |
| एप्रिल | ९३३ | १७१ | ० |
| मे | १३०८ | ३९५ | ०१ |
| जून | १२१४ | २०९ | ० |
| जुलै | ८४७ | २८१ | ०१ |
| ऑगस्ट | ९३९ | ४४४ | ० |
| सप्टेंबर | १०२८ | ३३६ | ० |
| ऑक्टोंबर | ९६० | २५८ | ०१ |
| **एकूण** | **९७५७** | **२५७४** | **०३** |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, आत्तापर्यंत केलेल्या नॅट तंत्रज्ञान तपासणी दरम्यान **३ रक्तदात्यांची तपासणी** positive आली. म्हणजेच एका रक्तदात्याने दिलेल्या रक्ताचे चार घटक वेगवेगळ्या रुग्णांना करिता उपयोगी पडतात. त्यामुळे **१२ (३X४)** रुग्णच नाही तर त्यांचे परिवार ही आपण सुरक्षित करू शकलो, याचे समाधान आहे. पण मनाला ही खंत पण जाणवते की नॅट टेस्टेड न केलेल्या **७१८३** रक्त व रक्तघटकातून अंदाजे **३० रुग्णांना** विषाणूंचा प्रादुर्भाव झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या अहवालानुसार आपण ३० % नॅट रक्त व रक्तघटकाचे वितरण केले आहे पण हे प्रमाण १००% पर्यन्त पोहोचविणे आपले नैतिक कर्तव्य आहे. या तंत्रज्ञानाची माहिती संपूर्ण जिल्ह्यात पोहोचविण्याचे कार्य सर्वांच्या सहकार्याने शक्य होणार आहे. जेणेकरून अनेक परिवारांना सुरक्षित करणे शक्य होईल. NAT मुळे सेवा शुल्क जास्तीचे द्यावे लागते पण आयुष्यभराची सुरक्षितता लाभते.

**डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी (एम.डी.पॅथ.)**
चेअरमन,रक्तपेढी

# संस्थेचा प्रमुख सेवाभावी उपक्रम
# जेनेरीक मेडिकल स्टोअर्स व रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना

जेनेरीक मेडिसीन भारत सरकार पुरस्कृत उपक्रम आहे. जनतेला स्वस्त औषधी मिळावी या साठीचा प्रकल्प आहे. प्रगत देशात (अमेरीका) केवळ जेनेरीक औषधीच विकली जातात. सर्व औषधी उत्पादन कंपन्यांनी बँडेड औषधी सोबत त्याच प्रक्रियेने व त्याच मुळ घटकांसह त्याच तपासणी निकषांद्वारे उत्पादन करावे असे कायदेशीर बंधन आहे. यामुळे सर्व कंपन्यांना जेनेरीक औषधी निर्मिती करावीच लागते दर्जेदार औषधी स्वस्त मिळतात. सामान्यत: डॉक्टरांचा नामवंत कंपन्यांना उत्पादनावर विश्वास असतो. या करिता रेडक्रॉसमध्ये केवळ नामवंत कंपन्यांची औषधी विकली जाते.

## जेनेरीक मेडिसीन (जनऔषधी) स्टोअर्स व दीर्घायु दवाखाना

१.फुलफगर फार्मा. जी - ६, लक्ष्मी प्लाझा, विसनजी नगर, क्रांती ट्रेडर्स समोर, जळगाव
श्री. प्रसन्न फुलफगर - फोन - ०२५७ - २२३९९८१, ७५८८९९८१८१ येथील जेनेरीक मेडीकल्स स्टोअर्स सेवेसाठी कार्यरत आहे.
२.श्रीपाद जेनेरीक क्लिनिक अँड रेवती मेडिको जेनेरीक औषधलय, श्री गुरुदत्त मंदीरा समोर, ममुराबाद रोड, शनिपेठ, जळगाव - डॉ. प्रशांत गर्ग, बी.ए.एम.एस. - संपर्क क्र. ७३८५२८३७३९ हे वैद्यकीय सेवेसाठी कार्यरत आहे. रुग्ण तपासणी फी - रु.१०, इंजेक्शन फी रु.१०, वाफ देणे (नेबुलायझेशन) रु.२०, सलाईन लावणे (लहान) - रु.३०, (मोठी) रु.६०, ड्रेसिंग - रु.२० व शेक रु.३० इत्यादि प्रमाणे अल्पदरात आकारणी केली जाते. ३. ओम शिवसाई जेनेरीक मेडिकल स्टोअर्स, कमल लॉन्सच्या मागे जुना खेडीरोड जवळ, महादेवमंदिर समोर, जळगाव - श्री. गोवर्धन पाटील - संपर्क क्रमांक - ९४०३२४९५९३ - दिनांक - ११ नोव्हेंबर, २०१६ येथील जेनेरीक दवाखान्यात डॉ. विद्याधर कोल्हे, बी.ए.एम.एस. - संपर्क क्रमांक - ९८५०१०७०३१ हे वैद्यकीय सेवेसाठी कार्यरत आहे. वैद्यकीय सेवा देतांना नाममात्र तपासणी फी रकम रु.१०, इंजेक्शन देणे फी रु.१५ रुग्णांकडून घेतली जाते. या व्यतिरिक्त रेडक्रॉस अंतर्गत कार्यरत जेनेरीक दीर्घायु दवाखान्यात सकाळी ९ ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते रात्री ९ पर्यंत रुग्णसेवा सुरू असते. सरासरी ७० ते ८० रुग्ण याचा लाभ घेतात. अल्पदरात सेवाभावी दृष्टीकोनातून आरोग्य सेवा उपलब्ध करून रुग्णांची काळजी घेतली जाते. रुग्णांना जेनेरीक औषधी हे मूळ छापील किमंतीच्या (M.R.P.) ४० ते ६० टक्के कमी किमंतीला मिळतात. दीर्घायु दवाखाना येथे रुग्णांची तपासणी करणे व जेनेरीक औषधी लिहून देणे या सोयी उपलब्ध असल्यामुळे, जेनेरीक मेडिसीन स्टोअर्सला जळगाव व परिसरातील शहरात उस्फूर्तपणे वाढता प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे रेडक्रॉस भवनच्या पूर्वेकडे रस्त्याला लागून मेडिकल स्टोअर्स काढण्याचा प्रयत्न आहे.

**जेनरिक औषधी**

● परिणामकारक ● शासनमान्य, ब्रँडेड दर्जाची. ● ब्रँडेडचीच उत्पादक कंपनी. ● ब्रँडेड मेडिसीनचीच उत्पादन प्रक्रिया व दर्जा ● जागतीक आरोग्य संघटना पुरस्कृत ● तेच मूळ घटक ● किमंत स्वस्त

**पुढील सर्वसाधारण विकारांवर जेनेरीक औषधे उपलब्ध.**

ताप, मधुमेह, रक्तदाब, मलेरिया, टायफाईड, क्षयरोग, स्नायूवेदना, फ्लू, विषाणूबाधा, संसर्गजन्य रोग याकरीता सर्व प्रकारची औषधी, किंमत स्वस्त असल्याने पैशांची बचत.

**पुढील नामवंत कंपन्यांची जेनेरीक औषधी विकली जातात.**

सिपला, रॅनबक्सी, व्होकार्ड, टोरेन्ट, सँडोज, ल्युपीन, अँलोंबीक, बायोकेम, कॅडीला, इंड्स्वीप, एमक्युअर इत्यादि नामवंत कंपन्यांची जेनेरीक औषधे उपलब्ध आहेत.

**रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना - रुग्णसेवा सुरु**

मागील वर्षी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रा. शालिग्राम नवलराम पाटील व सौ. जिजाबाई शालिग्राम पाटील यांनी जळगाव महानगरपालिका यांच्या हद्दीतील गाव मौजे पिंप्राळा शिवारातील, विभाग क्रमांक ४८, याचा शेत गट नंबर

१५५, यामधील प्लॉट नं. १५ याचे क्षेत्र १४३.८५ चौरस मीटर म्हणजेच १५४८ चौरस फूट जागेत खाली मेडिकल स्टोअर्स, रुग्णांचे वेटिंग व नोंदणी कक्ष व त्याला लागून डॉक्टर तपासणी रूम व चार ते पाच पलंगाचा इन डोअर सलाईन लावणे ट्रीटमेंटची व्यवस्था असलेला दवाखाना तसेच गच्चीवर एक छोटी स्टोअर रूम, कंपाऊंड वॉल, बोअर वेल, नळ फिटिंग, इलेक्ट्रिक फिटिंग व इलेक्ट्रिक मीटरसह, जिना इत्यादि अद्ययावत इमारत साधारणपणे १००० स्क्वेअर फूट बांधकाम केलेले अंदाजे ३५ ते ४० लाख रुपये किंमतीचे हॉस्पिटल चालविण्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा, जळगावला दान केले. त्याची रीतसर नोंदणी कार्यालयात दानपत्र झालेले असून रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना अत्यल्प दरात रुग्णसेवेसाठी सज्ज आहे. त्याचा उद्घाटन सोहळा १० मार्च २०१९ रोजी मा. श्री. किशोर राजे निंबाळकर - सचिव मदत व पुनर्वसन (महाराष्ट्र राज्य) यांचे शुभहस्ते व डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.) संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होऊन सदरचे हॉस्पिटलचे लोकार्पण करण्यात आले. धर्मार्थ दवाखान्यात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी दिवसभर मोफत लसीकरण केले जाते. लहान मुले, गर्भवती महिलांना याचा लाभ होतो. महानगरपालिकेच्या वतीने लसीकरणाची सोय केली जाते. आजूबाजूच्या परिसरातील सर्व गोर गरीब रुग्ण पाटील धर्मार्थ दवाखान्यात रुग्ण सेवा व लसीकरणाचा लाभ घेत आहेत.

**प्रा. शेखर सोनाळकर**
चेअरमन जेनेरीक समिती

## ई सेतु व आधार सुविधा केंद्र :-

रेडक्रॉस भवन येथे ई सेतु सुविधा केंद्र व आधार सुविधा केंद्र शासकीय सेवाशुल्कात सुरू करण्यात आले असून उत्पन्न दाखला, आधार कार्ड(नवीन दुरूस्ती), ७/१२ उतारा, हयातीचा दाखला (जीवन प्रमाणपत्र), उद्योग आधार, पॅन कार्ड, वय, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखला, ड्रायविंग लायसन्स, पासपोर्ट, नॉन क्रिमीलेअर, परीक्षा / नोकरी, जेष्ठ नागरिकत्व, परीक्षा / नोकरी, ऑनलाइन फॉर्म, जी.एस. टी. रिटर्न, चारित्र्य पडताळणी (पोलिस व्हेरिफिकेशन, इन्शुरंस, महिला ३३% आरक्षण प्रमाणपत्र, विजबील भरणा सर्व प्रकारचे प्रतिज्ञा पत्र, एस.ई.सी. प्रमाणपत्र, नवीन रेशन कार्ड इत्यादि सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे व त्यासाठी स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आले असून सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नागरिकांच्या सेवेसाठी रेडक्रॉस भवन सिव्हिल हॉस्पिटल शेजारी, न्यू बी.जे मार्केट जवळ, जळगाव येथे सुरू आहे.

दिव्यांग बांधवाना अपंगत्व प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी,(UDID) सक्तीची करण्यात आलेली आहे. या नोंदणी मुळे दिव्यांग बांधवाना शासनाच्या सर्व सुविधांचा लाभ घेणे शक्य होईल. म्हणून

दिव्यांग बांधवांसाठी अपंगत्व प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी, (UDID ), बस सवलत पाससाठी नोंदणी या सुविधा अल्पदरात रेडक्रॉस भवन येथे उपलब्ध केल्या आहेत. बहुसंख्य दिव्यांग बांधव या सुविधेचा लाभ घेत आहेत.




रेडक्रॉस भवन येथे आपले सरकार सेवा केंद्राचे उदघाटन

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC)

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग अंतर्गतचे दिव्यांगांच्या सर्वागिण पुनर्वसनार्थ जिल्हास्तरावरील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) हे इंडियन रेडक्रॉस सोसायटीने माहे जानेवारी २०१८ पासून मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा व्यवस्थापन समिती व इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या मान्यतेने चालविण्यात घेतले आहे. सदर केंद्रामार्फत जिल्ह्यातील दिव्यांगांचे शारिरीक, मानसिक, आर्थीक, शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसनाचे कार्य चालते. त्या अंतर्गत दिव्यांगांना सहाय्यक साहित्य उपलब्ध करुन देणे, त्यांना स्पिचथेरेपी, सायकोथेरेपी, फिजीयोथेरेपी इ. सेवा देणे तसेच पालकांचे समुपदेशन करणे त्यांना सल्ला व मार्गदर्शन करणे, मेळावे, शिबीरे आयोजीत करुन त्यांना आवशयकतेनुसार शासनाच्या मदतीने संस्थेच्या मदतीने सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे इ. कार्य करण्याचे सुरु आहे.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रातर्फे आयोजीत उपक्रम



१. दि. १२ ऑक्टोंबर २०१८ रोजी नियोजन भवन येथे केंद्र शासनाच्या दिव्यांगासाठी पारीत कायदा दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनीयम २०१६फ्फ बाबत जनजागृतीपर जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केंद्र शासनाच्या समेकीत क्षेत्रीय केंद्र, नागपुर (CRC) यांच्या सहभागाने करण्यात आले. त्यात जिल्ह्यातील ३५० व्यक्ती सहभागी होते.

